# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर-२७८१/२०२२

**अपिलार्थी, श्री.शेखर गजानन पाटणकर,**
**७०२/ बी २, शिवांजली सोसायटी, अल्मेडा बाग,**
**अल्मेडा रोड, चंदनवाडी ठाणे (प), जि.ठाणे ४०० ६०२.**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा समाज विकास अधिकारी, ठाणे महानगरपालिका ठाणे, महापालिका भवन, जनरल अरुण कुमार वैद्यमार्ग, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे (प), जि.ठाणे ४०० ६०२.

जन माहिती अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकण, ठाणे-१, ठाणे महानगरपालिका मंडई इमारत, खेवरा सर्कल, ग्लॅडी अल्वारीस रस्ता, मानपाडा, ठाणे (प), जि.ठाणे ४०० ६१०.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपायुक्त, समाज विकास विभाग, ठाणे महानगरपालिका ठाणे, महापालिका भवन, जनरल अरुण कुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे (प), जि.ठाणे ४०० ६०२.

**व्दितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ६.१.२०२६**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ६.६.२०२२ | ३०.६.२०२२<br>२०.७.२०२२ | २९.७.२०२२ | २९.८.२०२२ |

अपिलार्थी यांनी दि.२९.९.२०२२ रोजीच्या अर्जान्वये "माहिती अधिकार व प्रथम अपिल यांत दिलेला उत्तर समाधानकारक नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ६.१.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. दशरथ वाघमारे, समाज विकास विभाग, ठाणे, विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. महेश रामचंद्र जाधव, नायब तहसिलदार, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण, ठाणे, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. शिवाजी आनंदराव देशमुख, अव्वल कारकून, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण, ठाणे आणि विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्रीम. अनघा कदम, उपआयुक्त, समाज विकास विभाग,ठाणे महानगरपालिका ठाणे हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"(आमच्या शिवांजली सोसायटीत खालील नमूद केलेल्या नावांना ज्या कागदपत्राच्या आधारे लाभार्थी म्हणून मंजूरी मिळाली आहे, ती कागदपत्रे मिळावीत १.सुजाता प्रभाकर इंदुलकर (बी १, १०२) २.सुनंदा महादेव देसाई (बी १, ३०७) ३. निवृत्ती तुकाराम गाडे (बी १, ४०८), ४. अशोक जयसिंग साळवी (बी १, ५०६), ५. प्रकाश परशुराम चव्हाण (बी १, १०७), ६. शितल चंद्रकांत थोरवे (बी १, ८०४), ७. अविनाश साळवी (बी ३, ८०१).)*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "मिळालेला उत्तर समाधानकारक नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

अपिलार्थींनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२९.८.२०२२ रोजी सुनावणी घेऊन, सदर संस्थेची मूळ नस्ती संदर्भ क्रमांक ठा.म.पा./श.वि.वि./७७० दि.१४.५.२०२५ अन्वये सहाय्यक संचालक नगर रचना, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ठाणे यांचेकडे अग्रेषित केली आहे. तसेच शासनाकडील अधिसूचना क्र. झोपुयो/१२०३/प्र.क्र.६८/२०१६/झोापुसू १ दि.२७.६.२०१६ नुसार

सदर अधिनियमाच्या कलम ३ (१) अन्वे ठाणे महानगरपालिकेकडील झोपडपट्टी पुनर्वसन योजना संदर्भात निर्णय घेण्याचे सक्षम प्राधिकारी यांचे अधिकार संपुष्टात आले असून एस.आर.ए. प्राधिकरण ठाणे यांचेकडून झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेत येत आहे. तरी पात्र /अपात्र करण्याची कार्यवाही SRA विभागाकडून करण्यात येत आहे. अर्जदार यांनी सदरची माहिती झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्याकडून उपलब्ध करून घ्यावी." असे आदेश पारित करून अपिल निकाली काढले आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांनी माहिती मागण्याचा अर्ज हा उपजिल्हाधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठामपा मंडई इमारत, खेवरा सर्कल, ग्लॅडी अल्वारीस रोड, मानपाडा, ठाणे (प) ४०० ६१० यांच्याकडे केला होता. त्यानंतर सदरचा अर्ज दि.३०.६.२०२२ रोजी ठाणे महानगरपालिकेच्या समाज विकास विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आला. त्यानंतर ठाणे महानगरपालिकेच्या समाज विकास विभागाने दि.२०.७.२०२२ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस असे कळविले की, या विषयाबाबतची संबंधित संस्थेची मूळ नस्ती संदर्भ क्र. ठामपा/शविवि/७७० दि.१४.५.२०१५ अन्वये सहाय्यक संचालक नगर रचना ठाणे महानगरपालिका ठाणे यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे या कार्यालयाकडे पुढील विहित कार्यवाहीस्तव अग्रेषित केली आहे. अशा प्रकारे आपणास माहिती प्राप्त न झाल्याने आपण प्रथम अपिलिय अधिकारी यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलिय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर दि.२९.८.२०२२ रोजी सुनावणी घेऊन वर नमूद केल्याप्रमाणे आदेश पारित केले आहेत.

प्रथम अपिलिय अधिकारी यांच्या या आदेशाने व्यथित होऊन अपिलार्थी यांनी सदरचे द्वितीय अपिल दाखल केले आहे.

या संदर्भात खुलासा करताना समाज विकास विभागाच्या अधिका-यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, ठाणे महानगरपालिकेच्या सहाय्यक संचालक नगररचना विभाग, ठाणे महानगरपालिका ठाणे यांनी संदर्भ क्र. ठामपा/शविवि/७७० दि.१४.५.२०१५ अन्वये एकूण १० प्रकरणांच्या मूळ नस्ती मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रे, मुंबई यांच्याकडे दि.१४.५.२०१५ रोजी हस्तांतर केल्या आहेत. सदर पत्रासोबत जोडलेल्या यादीमध्ये क्र. ५ येथे विकास प्रस्ताव क्र. २००६/१३७, अंतिम भूखंड क्र. ३८६, नरयो क्र. १, पांचपाखाडी, ठाणे (प) येथील शिवांजली को. ऑप. हौ. सोसा., वास्तुविशारद श्री. अनिरुध्द गुर्जर, पृष्ठ क्र. ४८७/प ते १३९९/प, १४०१/प ते २४८७/प पृष्ठे असलेली नस्तीचे एकूण ३ भाग मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे यांच्याकडे पाठविण्यात आल्याचे दिसून येते. सदरचे पत्र दि.९.७.२०१५ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रे, मुंबई यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाल्याबाबत त्या कार्यालयाचा शिक्का व स्वाक्षरी जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान आयोगास सादर केली. यावरून ठाणे महानगरपालिकेतर्फे या नस्तीमधील सर्व कागदपत्रे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रे, मुंबई यांच्याकडे हस्तांतर झाल्याचे दिसून येते.

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. महेश रामचंद्र जाधव, नायब तहसिलदार, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे-१ हे सुनावणीस उपस्थित आहेत. त्यांनी असे निवेदन केले की, त्यांनी ठाणे महानगरपालिकेकडे ज्या कागदपत्रांच्या आधारे सदस्यांना पात्र व अपात्र केले आहे त्या कागदपत्रांच्या प्रती त्यांनी प्राप्त केल्या नाहीत तर केवळ परिशिष्ट २ ची यादी प्राप्त केली आहे. त्यामुळे ही माहिती मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे यांच्याकडे उपलब्ध नाही. मात्र, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे-१ यांनी या प्रकरणाची संपूर्ण नस्ती झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रे, मुंबई यांच्याकडे पाठविली आहे व त्यांनी ती दि.९.७.२०१५ रोजी स्वीकारली आहे. त्यानंतर आणखी काही कागदपत्रे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रे, मुंबई यांच्याकडे देण्यात आली आहेत याचा पुरावा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रे, मुंबई यांनी सुनावणी दरम्यान आयोगास सादर केलेला नाही. याचाच अर्थ अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रे, मुंबई यांच्याकडेच उपलब्ध आहे व त्यांनी ती उपलब्ध करून देणे आवश्यक होते. तथापि, अपिलार्थी यांचा अर्ज हस्तांतर करण्यासाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. शिवाजी आनंदराव देशमुख, अव्वल कारकून, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे-१ यांची कृती अयोग्य असल्याचे दिसून येते. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. शिवाजी आनंदराव देशमुख, अव्वल कारकून, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे-१ यांनी अपिलार्थी यांचा माहिती अधिकार अधिनियमांतर्गतचा अर्ज सदरची माहिती त्यांच्याच कार्यालयात उपलब्ध असताना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रे, मुंबई यांना हस्तांतर केल्यामुळे अपिलार्थी यांना माहिती मिळण्यास विलंब झाला. या झालेल्या विलंबाबद्दल विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. शिवाजी आनंदराव देशमुख, अव्वल कारकून, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे-१ यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम

२००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. शिवाजी आनंदराव देशमुख, अव्वल कारकून, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे-१ यांनी पुढील सुनावणीस आयागोकडे स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. त्याचप्रमाणे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे-१ यांनी अपिलार्थींनी मागणी केलेली माहिती पुढील १५ दिवसांत शीघ्र टपालाने विनामूल्य पुरविणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. **विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे-१ यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसात शीघ्र टपालाने नि:शुल्क पुरवावी. जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.**

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. शिवाजी आनंदराव देशमुख, अव्वल कारकून, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण, ठाणे-१ यांनी अपिलार्थी यांचा दिनांक ६.६.२०२२ रोजीचा माहिती अर्ज, सदरची माहिती त्यांच्याच कार्यालयात उपलब्ध असताना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रे, मुंबई यांना हस्तांतर केला व त्यामुळे अपिलार्थी यांना माहिती मिळण्यास विलंब झाला यास्तव त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु. २५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये, **याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे दि.१२.२.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, प्रस्तुत प्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

३. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१२.२.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ६ जानेवारी, २०२६

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. शिवाजी आनंदराव देशमुख, अव्वल कारकून,
मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण, ठाणे-१,
ठाणे महानगरपालिका मंडई इमारत, खेवरा सर्कल, ग्लॅडी अल्वारीस रस्ता, मानपाडा, ठाणे (प),
जि.ठाणे ४०० ६१०.

**-यांना प्रत** विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. महेश रामचंद्र जाधव, नायब तहसिलदार,
मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण, ठाणे-१,
ठाणे महानगरपालिका मंडई इमारत, खेवरा सर्कल, ग्लॅडी अल्वारीस रस्ता, मानपाडा, ठाणे (प),
जि.ठाणे ४०० ६१० **यांचेमार्फत रवाना.**

**अपिल क्रमांक : के.आर-२७८१/२०२२**

**अपिलार्थी, श्री.शेखर गजानन पाटणकर,**

**सुनावणी दिनांक १२.२.२०२६ (In continuation of order dt.६.१.२०२६)**

**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. महेश रामचंद्र जाधव, नायब तहसिलदार, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण, ठाणे, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. शिवाजी आनंदराव देशमुख, (सेवानिवृत्त), अव्वल कारकून, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण, ठाणे हे उपस्थित आहेत.

या प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. महेश रामचंद्र जाधव, नायब तहसिलदार, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण, ठाणे-१ यांनी असे निवेदन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही ठाणे

महानगरपालिकेकडून प्राप्त झालेल्या नस्तीमध्ये नाही. ठाणे महानगरपालिकेकडून प्राप्त झालेल्या नस्ती या अपिलार्थी यांना कार्यालयात बोलावून दाखविण्यात आल्या. त्यांनी स्वत: या नस्तींची पाहणी केली असता त्यांना शिवांजली सहकारी गृहनिर्माण संस्था, अल्मेडा बाग, ठाणे या नस्तीतील सदस्यांच्या वैयक्तिक पात्रतेच्या नस्ती आढळून आल्या नाहीत. सबब, पुढील सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी तथा समाज विकास अधिकारी, ठाणे महानगरपालिका ठाणे यांना आयोगाकडे स्वत: उपस्थित राहण्याबाबत कळविणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.७.४.२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १२ फेब्रुवारी, २०२६

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
जन माहिती अधिकारी तथा समाज विकास अधिकारी,
ठाणे महानगरपालिका ठाणे, महापालिका भवन,
जनरल अरुण कुमार वैद्यमार्ग, चंदनवाडी, पाचपाखाडी,
ठाणे (प), जि.ठाणे ४०० ६०२.

**अपिल क्रमांक : के.आर-२७८१/२०२२**

**अपिलार्थी, श्री.शेखर गजानन पाटणकर,**

**सुनावणी दिनांक ७.४.२०२६ (In continuation of order dt.१२.२.२०२६)**

**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. महेश रामचंद्र जाधव, नायब तहसिलदार, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण, ठाणे, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. शिवाजी आनंदराव देशमुख, (सेवानिवृत्त), अव्वल कारकून, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण, ठाणे हे उपस्थित आहेत.

या प्रकरणी तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. दशरथ वाघमारे, समाज विकास विभाग, ठाणे हे त्यांना आजच्या सुनावणीची सूचना प्राप्त होऊनदेखील ते सुनावणीस अनुपस्थित आहेत. त्यांच्या अनुपस्थितीबाबत त्यांनी आयोगास काहीही कळविले नाही. सबब, पुढील सुनावणीस त्यांना आयोगाकडे स्वत: उपस्थित राहणेबाबत समन्स बजावण्यात यावे. सदर समन्सची बजावणी वरीष्ठ पोलीस निरिक्षक, नौपाडा पोलीस स्टेशन, एम. जी. रोड, शाहू मार्केटच्या समोर, नौपाडा, ठाणे, ठाणे ४०० ६०२ यांचेमार्फत करण्यात यावी. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.७.५.२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता घेण्यात येईल.**

**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ७ एप्रिल, २०२६

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ,**
**दालन क्र. ५२७ व ५२८, ५ वा मजला,**
**कोंकण भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ